एखाद्या विषयात अतिशय समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या माणसाला पाहण्यात, त्याचे काम जवळून समजून घेण्यात एक वेगळाच आनंद दडलेला असतो...

अशाच एका कलंदर, जिद्दी आणि मनस्वी माणसाच्या भेटीचा योग आज जुळून आला.

हे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. प्रदीप लोखंडे.

तब्बल २० लाख पुस्तके सहा हजार गावांत घेऊन जाणारा विक्रमवीर, पोस्टमन मॅन ऑफ इंडिया आणि 'रुरल रिलेशन' या आपल्या मातीशी, गावाशी घट्ट नाळ जोडणाऱ्या संस्थेचे प्रमुख असणारे हे एक अफलातून व्यक्तिमत्त्व. म्हटलं तर रांगडे, स्पष्ट, परखड आणि तितकेच दिलखुलास... पण त्याहीपेक्षा या माणसात सगळ्यात महत्त्वाची आहे ती त्याची नजर. सतत भविष्याचा वेध घेणारी... काळाच्या पुढचं पाहणारी... नव्या स्वप्नांचा पाठलाग करणारी... सतत काहीतरी चांगलं करण्यासाठी धडपडणारी...!

परिवर्तन युवा परिषदेच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने आज प्रदीप लोखंडे यांना त्यांच्या बी. टी. कवडे रोड येथील कार्यालयात भेटायला जायचे होते. आमचे सारथ्य खुद्द समीरदादा जाधवराव करीत होते. किशोरजी ढगे, प्रफुल्लजी कुलकर्णी सर, प्रसाद कुलकर्णी. राहुल मोकाशी सर, विठ्ठल अशी सगळी मांदियाळी त्यांना भेटायला पोहोचली.

त्यांचं कार्यालय कसलं.. पूर्वी जशी खजिना भरलेली एखादी खोली असायची आणि तिथे सोनं, नाणी, दागिने यांच्या राशी लागलेल्या असायच्या आणि हंडेच्या हंडे भरलेले असायचे. तसं इथं 'अक्षरधन' भरून ठेवलेल्या खोल्या होत्या. सगळीकडे पुस्तकंच पुस्तकं.. ❤

राज्यभरच नव्हे देशभरात पुस्तक पोहोचवण्याची एक सक्षम यंत्रणा तिथे कार्यरत होती. सगळीकडून आलेली प्रतिसादाची पत्र अतिशय चांगल्यारीतीने संग्रहित करून ठेवलेली होती आणि त्याचे डिजिटलायझेशनसुद्धा केलेले दिसत होते. एकूणच सुनियोजित पद्धतीने चाललेला कारभार चटकन लक्षात येत होता.

या पूर्वी 'लोकमत' च्या निमित्ताने प्रदीप लोखंडे सरांशी भेटी-गाठी झाल्या होत्या. पण औपचारिकतेच्या गाठी उलगडल्याशिवाय खरा माणूस कळत नसतो. आज त्यांच्याशी झालेल्या संवादातून त्यांचं मोठेपण, कामाची प्रचंड व्याप्ती, त्यात असलेलं काटेकोर नियोजन आणि समाजात दुवा बनून किती मोठं काम उभं करता येऊ शकतं या साऱ्याचं प्रत्यंतर आलं.

युवा परिषदेसाठी आवश्यक मौलिक मार्गदर्शन दिलंच. पण तितक्याच मोकळेपणाने चांगली, मोठी माणसं जोडून दिली. जाताना आम्हाला प्रत्येकाला हक्काने, जे हवं ते निवडा या बोलीवर एक पुस्तक भेट मिळालं.

सुमारे दीड-दोन तास मनसोक्त गप्पा मारताना वेळ कसा गेला कळलं नाही. पण मनमोकळा संवाद आणि पुस्तकांसह आनंदाचा ठेवा घेऊन बाहेर पडलो तेव्हा मनात मात्र समाधानाची धून संथ लयीत वाजत राहिली होती...
💓